# के जे'स एज्युकेशनल इन्स्टिटयुट, पुणे

---

## "केजेईआय शिष्यवृत्ती योजना शै.वर्ष २०१७-१८"

१. शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांस भराव्या लागणा-या 'फी' मध्ये सवलत म्हणून देण्यात येईल.

२. शासकीय वा अन्य योजनेतून मिळणा-या 'फी' च्या परताव्यावर ही सवलत लागू होणार नाही.

३. शासकीय प्रवेश प्रक्रियेत गुणवत्ता यादीसाठी ग्राहय धरल्या जाणा-या गुणांवर ही शिष्यवृत्ती अवलंबून आहे.

४. प्रथम वर्ष पदवी प्रवेशासाठी फिजिक्स, केमिस्ट्री व गणित या विषयात महाराष्ट्र राज्याच्या बारावीचे (किंवा समकक्ष परिक्षेत) एकाच प्रयत्नात मिळालेल्या एकत्रित गुणांचा शिष्यवृत्तीसाठी विचार होणार आहे.

५. थेट द्वितीय वर्षाच्या पदवी प्रवेशासाठी शासकीय गुणवत्ता यादीतील गुण शिष्यवृत्तीसाठी ग्राहय धरले जातील.

६. प्रत्येक सत्रात प्रत्येक विषयासाठी पंच्याऐंशी टक्के हजेरी व वार्षिक परिक्षेत सर्व विषयात पास होवून एकत्रितपणे पंचावन्न टक्के गुण (किंवा एकत्रित सी.जी.पी.आय. समकक्ष गुण) मिळवण्याच्या अटीवर ही फी सवलत पदविधर होईपर्यंत सुरु राहू शकेल.

७. या विविध सवलतीच्या जागा प्रत्येक तुकडी/शाखा व संस्थेमध्ये राखीव असून प्रत्येक अर्जदार विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी त्या राखून ठेवायच्या असून शासकिय प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक फेरीत प्रवेश मिळताच आमचेच संस्थेत त्या जागेवर प्रवेश घेतला तरच सदर फी सवलत लागू होईल.

८. प्रवेश रद्य केल्यास ही सवलत आपोआप रद्य होईल.

९. ही सवलत शासकीय प्रवेश प्रक्रियेतून आमच्याच संस्थेत विद्यार्थ्यांने अर्ज करुन राखून ठेवलेल्या जागेसाठीच मर्यादित असून सवलत संस्था स्तरावरील प्रवेशांना लागू नाही.

१०.विद्यार्थ्याने अर्ज करुन राखून ठेवलेल्या जागेवर शासकीय प्रवेश फेरीत प्रवेश शासकीय प्रक्रियेत मिळताच लगेच आमचे संस्थेत प्रवेश घेतला तरच सवलत लागू होईल. त्यापुढील फे-यात त्याची जागा व सवलत आपोआप रद्य होईल.

११.अर्जदार विद्यार्थ्याने आमचे संस्थेत प्रवेश घेताना सवलत वजा जाता उर्वरीत देय रक्कम पूर्णपणे भरुनच प्रवेश घेता येईल.

१२.शासकीय प्रवेश प्रक्रियेत अर्ज न केलेल्या व शासकीय गुणवत्ता यादीत नसलेल्या विद्यार्थ्यांना ही सवलत लागू नाही.

१३.सवलतीचा तुकडी, शाखा व संस्थावार जागा आणि त्या साठी आवश्यक अशा कमीत कमी गुणांचा तक्ता सोबत दिला आहे.

१४.जास्त सवलतीची जागा प्रवेश राखून ठेवताना पात्र असूनही उपलब्ध नसल्यास कमी सवलत असलेली जागा प्रवेशार्थिंना राखून ठेवता येईल व जास्त सवलतीची जागा उपलब्ध झाल्यास पात्र अर्जदार विद्यार्थ्यांना तुकडी, शाखा व संस्थावार त्या देण्याची व्यवस्था त्या-त्या फेरीतच केली जाईल.

# के जे'स एज्युकेशनल इन्स्टिटयुट, पुणे

---

## **फी सवलत/शिष्यवृत्ती मिळण्यासाठीची अर्जदारांनी करायची प्रक्रिया खालील प्रमाणे राहिल.**

१. संस्थेची जाहिरात पाहून इंटरनेटचे माध्यमातून ऑन लाईन अर्ज डाउनलोड करुन भरावा. त्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायाप्रती लावून तो आमचे संस्थेत रु. ५००/- भरुन जमा करावा. यासाठी दहा दिवस मुदत असेल.

२. अर्जदार विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी त्यानंतरचे दिवशी (अकराव्या) आमचे संकेत स्थळावर लागेल. ती पाहून त्यात दुरुस्ती असल्यास मूळ कागदपत्रे घेवून त्वरीत भेटावे.

३. बारावे दिवशी सकाळी ११.०० वाजेपर्यंत गुणवत्ता यादीतील दुरुस्त्या स्विकारल्या/केल्या जातील. यासंबंधी संस्था घेईल तेच निर्णय बंधनकारक असतील.

४. बारावे दिवशी दुपारी दोन वाजता सर्व अर्जदार विद्यार्थी व त्यांचे वडिल (वडिल हयात नसल्यास आई वा कायदेशीर पालक- तशा पुराव्यासह) सर्व मूळ कागदपत्रांसह मुलाखतीसाठी हजर राहतील. अर्जदार व वडिल यांचे आधार कार्ड आवश्यक.

५. गुणवत्ता यादीतील हजर असलेल्या विद्यार्थ्यांनी (सोबतचे एका पालकासह) आपली मूळ कागदपत्रे दाखवून त्याची एक छायाप्रत देवून, आमच्या संस्थेत उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्ती/सवलतीच्या जागेची पात्रतेनुसार निवड करुन तसा लेखी अर्ज जमा करायचा आहे.

६. सर्व अर्जदार विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्याच्या शासकीय प्रवेश प्रक्रियेत भाग घेवूनच आमच्या संस्थेत प्रवेश मिळवायचा आहे.

७. अर्जदार विद्यार्थ्यांस ज्या शासकीय प्रवेश फेरीत अशी जागा देय होईल त्याच फेरीत आमचे संस्थेत येवून सवलतीची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम पूर्णपणे भरुन प्रवेश कायम करायचा आहे. अशी देय जागा त्याच फेरीत अर्जदाराने न घेतल्यास त्याला देवू केलेली शिष्यवृत्ती/सवलत आपोआप रद्द होईल.

८. प्रवेश घेतल्यावर सत्र सुरुवातीचे प्रथम दिवसापासून विद्यार्थ्यांनी हजर रहायचे असून सातत्य राखायचे आहे.

९. सर्व अर्जदार विद्यार्थ्यांना संस्थेतील विशेष खास अभ्यासक्रमास (सशुल्क) हजर राहता येईल व त्यासाठी वस्तीगृहाची सोय उपलब्ध असेल.